क्र/ना.भू.३ /प्रमाणित प्रती/प्र.क्र.७२/२०२२
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख
(म.राज्य) , पुणे कार्यालय.
दूसरा व तिसरा मजला , नवीन प्रशासकीय इमारत
विधान भवन समोर , कॅम्प , पुणे १
पुणे दिनांक : २२/०३/२०२२

**परिपत्रकः-**

**विषय : अर्धन्यायीक प्रकरणातील कागदपत्राचे सत्यप्रती व प्रमाणित प्रती देणेबाबत कार्यपध्दती.**

महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील प्रकरण १६ "संकीर्ण" कलम २३७ व २३८ मधील तरतुदी व महाराष्ट्र जमीन महसूल (भूमि अभिलेखाचे निरीक्षण , शोध व प्रती पुरविणे) नियम १९७० मध्ये भूमि अभिलेखांच्या प्रतींचे निरीक्षण शोध व पुरवठा या संबंधीच्या तरतूदी व नियम केलेले आहे.

२/- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे कडील अधिसूचना क्रमांक १०९५ / प्र. क्र.१२१ / ल- १ दिनांक २५/०९/२००१ अन्वये व तदनंतर वेळोवेळी निरीक्षण फी , शोध फी व प्रती पुरवठा करण्याची फी विहीत करण्यात आलेली आहे.

३/- आमचे असे निदर्शनास आले आहे की, अधिनस्त कार्यालयाकडून प्रमाणित प्रती , सत्यप्रती जनतेस वितरीत करण्याबाबत एकसमान पध्दत राबविली जात नाही. उदा. अपिल प्रकरणातील कागदपत्रे व रोजनामाच्या प्रमाणित प्रति मिळणेसाठी नागरीकाने भूमि अभिलेख विभागाच्या कार्यालयाकडे अर्ज केला असता उपअधिक्षक भूमी अभिलेख , नगर भूमापन अधिकारी , जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख , उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालयाने प्रमाणित प्रती देणे / न देणेबाबत वेगवेगळी पध्दत / धोरण अवलंबले आहे. याबाबीचा साकल्याने विचार करुन खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेत येत आहे.

४/- भूमि अभिलेख कार्यालयाकडून देण्यात येणा-या नकलांचे खालीलप्रमाणे सर्वसाधारण तीन गट पडतात.

i. अर्धन्यायिक प्रकरणांत भूमापन अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाच्या प्रती.
ii. भूमि अभिलेख व नकाशांच्या प्रमाणित प्रती जसे फेरफार नोंदवही / मिळकत पत्रिका / टिपण / इतर विहीत प्रपत्राची नक्कल, मोजणी नकाशे , आलेखावरुन देण्यात येणारे नकाशे , स्वयंसूची धारीकेतील कागदपत्रांच्या प्रती.
iii. अर्धन्यायिक व इतर प्रकरणामध्ये (मोजणी , फेरफार इ.) तयार होणारे किंवा सादर झालेल्या कागदपत्रांचे प्रती.

५/- मा. उच्च न्यायालयात , न्यायालयीन प्रकरणांमध्ये पक्षकारांच्या मागणीवरून किंवा बिगर पक्षकाराने उचित कारण दर्शविल्यानंतर दाव्यातील सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित / सत्यप्रती योग्य रक्कम / फी चा भरणा नियमानुसार केल्यानंतर नकला विहीत कार्यपध्दती अनुसरुन देणेबाबतची तरतूद आहे. त्याचधर्तीवर भूमापन

अधिकारी यांनी दिलेल्या अर्धन्यायिक प्रकरणांतील कागदपत्रे यांच्या प्रमाणित / सत्यप्रती देणेकामी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरावी.

I ) अर्धन्यायिक प्रकरणांतील पिठासन अधिका-यांच्या स्वाक्षरीने तयार होणारे अभिलेख / कागदपत्रे यांचे प्रमाणित प्रती देण्यात याव्यात. उदा. रोजनामा , अंतरीम आदेश , अंतिम निकाल , स्थगिती आदेश , जबाब इ.

II) अर्धन्यायिक प्रकरणांत दाखल कागदपत्रांपैकी ज्या कागदपत्रांच्या / अभिलेखांच्या प्रमाणित नकला मिळू शकतात व कायदयात देणेची तरतूद आहे अशा कागदपत्रांच्या / अभिलेखांच्या प्रमाणित प्रती विहीत कार्यपध्दती अनुसरुन प्राप्त करुन घेणेबाबत अर्जदार यांना सूचित करावे. उदा. सूची क्र. २ , मृत्यू दाखला , धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडील सूचीपत्र इ.

III) अर्धन्यायिक प्रकरणांत किंवा अन्य स्वरुपाच्या विभागाशी संबंधीत प्रकरणामध्ये पक्षकाराने दाखल केलेले कागदपत्रे याच्या नकला सत्यप्रती करुन देणेत याव्यात. उदा. अर्ज , अंतरीम अर्ज इ. सदरच्या सत्य प्रती देताना सर्व प्रतिंवर अपील प्रकरणांतील किंवा कागदपत्र ज्या प्रकरणांतील असेल अशा प्रकरणांतील कागदपत्रे उदा. अपील प्रकरण क्रमांक ........ मधील कागदपत्रे , मोजणी नोंदवही क्र. ........ मधील कागदपत्रे , फेरफार क्र. ....... मधील कागदपत्रे असा रबरी शिक्का नकलेवर उमटवावा.

IV) प्रमाणित नकला व सत्यप्रती देणेकामी विहीत कार्यपध्दती अनुसरणेत यावी व विहीत नक्कल फी आकारणी करणेत यावी.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी अतिशीघ्र करावी.

( स्वाक्षरीत /- XXX )
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य) , पुणे

प्रत : अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख पुणे यांना माहितीसाठी.
प्रत : उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन / एकत्रिकरण) पुणे यांना माहितीसाठी.
प्रत : उपसंचालक भूमि अभिलेख , सर्व यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
प्रत : जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख , सर्व यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
प्रत : उपअधिक्षक भूमि अभिलेख सर्व, विशेष उपअधिक्षक भूमि अभिलेख गांवठाण सर्व / नगर भूमापन अधिकारी , सर्व यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

// निर्गमित //

22/3/20

उपसंचालक भूमि अभिलेख,संलग्न
जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे